मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

६२४६

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ना०वा०
दा. क्र. ६२४६

IRBK-0106246

IRBK-0106246




म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा-वा
दा. क्र. ६२४६

# कादंबरी

मूल्य
५०
नये पैसे

ले० ६२६८८

सुरस साक्षर माला

# कादंबरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
२२१०८
अनुक्रम
विभाग ८३५
क्रमांक
दि. २९।५

निवेदक
प्रि. सुमेर जैन
एम्. ए. बी. टी.

सुरस ग्रंथमाला, सोलापूर

IRBK-0106246
IRBK-0106246

प्रकाशक
न. गौ. व्होरा
सुरस ग्रंथयला,
सोलापूर

★

प्रथमावृत्ति–१९५७

★

मुद्रक
कृ. ना. घळसासी
श्रीपांडुरंग मुदणालय
पंढरपूर

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि

# मनोदय

संस्कृत भाषा ही सर्व भारतीय भाषांची आई ! तिचं साहित्य अमाप अन् अमोल. केव्हांही वाचले तरी गोडी अवीट. पण ही गोडी केवळ संस्कृत जाणणाऱ्यापुरतीच मर्यादित होती. सामन्य वाचकांनाही त्या साहित्याचा आस्वाद घेता यावा म्हणून सुरस ग्रंथमालेनें ही योजना दोन-तीन वर्षापूर्वीच हातीं घेतली होती. पण त्याचवेळीं पॉकेट पुस्तकाची योजना समोर आली आणि तिला पहिला 'चान्स' मिळाला.

आम्ही नव्या वर्षी पुनः ती योजना हातीं घेतली. अगदी सामान्य जनतेला उत्कृष्ट संस्कृत, प्राकृत, तामिल, गुजराथी. कानडी ग्रंथाचा परीचय करुन द्यावा हीच मुख्य भूमिका, प्रथमतः संस्कृत ग्रंथांचा परिचय अगदी सुलभ, सोप्या व रसाळ भाषेंत करुन देण्याचा मानस आहे. साधारणतः बारा-तेरा वर्षाच्या मुलाला व नवसाक्षरांना समजेल अशीच वाक्यरचना व प्रयोग वापरण्यांत आले आहेत. उदात्त साहित्यच जीवन उन्नत बनवितें, हे जाणूनच जीवनाला सर्व दृष्टीनें समृद्ध बन-विण्यासाठीं या मालेची योजना आहे.

हें सारें करतांना खेड्यापाड्यांतील असंख्य नवसाक्षर बंधूंना आम्ही दृष्टीसमोर ठेवलें आहे. त्यांची भूक वाढली आहे. त्यांना सहज समजेल, उमजेल अशी संपादकीय दृष्टी या पुस्तकांतून कटाक्षानें ठेविली आहे. त्या असंख्य चातकांना ही कुसमें चंद्र किरणाप्रमाणें सुखी करोत हाच मालेचा मनोदय.

—प्रकाशक

# कादंबरी उघडण्यापूर्वी

हं, एकदम वाचूं नका. प्रथम हें वाचा. कादम्बरी म्हटल्या
बरोबर मराठी वाचकाची कपना वेगळी होते. जें पुस्तक तुम्ही
वाचणार आहांत त्याच पुस्तकाच्या नांवावरून कादम्बरी
हा शद्व मराठींत प्रचारांत आला. कादम्बरी म्हणजे रह-
स्यांनी भरलेली दीर्घ कथा! असा होता मूळचा अर्थ.
बाण नांवाचा एक मोठा कवि होऊन गेला. इ. स. ७ व्या
शतकांत संस्कृत भाषा राष्ट्रभाषा होती. त्या भाषेवर
या महाकवीचें दांडगें प्रभुत्व होतें ओळीओळींतून सौंदर्य
भरलेलें असें हें पहिलेंच संस्कृत गद्य-पद्यमय पुस्तक
आहे. कल्पनेच्या पंखावर बसून आपल्याबरोबर
वाचकालाहि हा कवि कधी सुंदर अरण्यांत,
तर कधी स्वर्गांत तर कधी सरोवराच्या कांठी
थोडीशी घेऊन जातो. या पुस्तकांतील गोष्ट
गुंतागुंतीची आहे, रहस्यमय आहे आणि
तुम्ही तल्लीन व्हाल. म्हणूनच वाचतांना ,
हें पहा, तुम्ही आतां उज्जनी शहरांत प्रवेश करीत आहात.

विभाग
क्रमांक
नों. दि.

# कादंबरी

गोष्ट आहे फार प्राचीन. अवन्ति नांवाचा देश. राजधानीचं नांव उज्जैन. फार मोठे शहर. सुंदरहि तसंच. मोठमोठालीं घरं. मोठमोठाले वाडे. प्रशस्त व विस्तीर्ण बागा. रस्त्याच्या दोन्हीं बाजूला सावली देणारी दाट झाडी. गांवच्या एका बाजूला क्षिप्रा नांवाची नदी. नदीनं गांवाला शोभा. आणि गांवाला नदीनं.

तारापीड हा त्या अवन्ति देशाचा प्रतापी राजा. तारापीड स्वतःच मोठा पंडित. तो पंडितांचा आदर करी. त्याच्या राज्यांत दान दिलं तरी घेणारा कोणी नव्हता. इतकं तें राज्य समृद्ध होतं. सधन होतं.

त्याच्या सुविद्य पत्नीचं नांव होत. विलासवती. ती रूपानं अप्सरेहून मोहक. धनानं लक्ष्मीहून श्रीमंत व बुद्धीनं सरस्वतीहून श्रेष्ठ.

त्याच्या मंत्र्याचं नांव शुकनास. शुकनास फारच तरबेज होता राजकारणांत. शिवाय तो राजाचा बालपणापासूनचा मित्र. म्हणूनच राजानं सर्व राज्याचं काम त्याच्यावर सोपविलं. व स्वतः सुखांत राहूं लागला. त्या मंत्र्याच्या स्त्रीचं नांव मनोरमा.

राजाला खरं पाहिलं तर कशाचीच कमतरता नव्हती. पण त्याला मूल नव्हतं. म्हणून तो दुःखी होता. एकदा त्याची बायको विलासवती देवळांत गेली. तेथें पुराण सांगणं चालूं होतं. महाभारताची कथा पुराणिक सांगत होते. ते म्हणाले, "ज्यांना मूल नाहीं त्यांच्या आत्म्याला मुक्ति नाहीं."

हें ऐकून राणीला फार दुःख झालं. ती रागारागानं घरीं आली. तिनं अंगावरील सर्व अलंकार फेकून दिले. वेणी सोडून टाकली. आणि एका कोपऱ्यांत जाऊन रडत बसली. ही वार्ता राजाला कळतांच तो धावतच तिच्या महालांत गेला. राजाला पाहून तिला आणखीच रडूं आलं. राजानं विचारलं,

"अग, पण रडायला झालंय् तरी काय?"

राणी कांहींच बोलली नाहीं.

राजा म्हणाला, "तुझी सर्व इच्छा पूर्ण करायला मी समर्थ आहे. सांग तुला काय हवं?"

पण ती मुळीच बोलली नाहीं. उलट अधिकच फुरंगटून बसली. इतक्यांत एका दासीनं सांगितलं, "हे राजन्, आपणाला मुलगा नाहीं म्हणून ही रडत आहे." राजाला तें ऐकून फार वाईट वाटलं. तो राणीला म्हणाला, "अग मूल होणं न होणं आपल्या हातांत का आहे?"

तिचं समाधान कांहीं होईना. तेव्हां राजा म्हणाला "असं पहा. पुराणांत सांगितलं आहे कीं ज्या स्त्रीला मूल होत नाहीं तिनं धर्मकार्यांत अधिक लक्ष घातलं पाहिजे. उद्यापासून शिवाची उपासना कर. तुझीहि इच्छा पूर्ण होईल. मला तर यांत मुळीच शंका वाटत नाहीं."

हें ऐकून राणीला धीर आला. तिनं शिवाची पूजा करायला सुरूवांत केली. दिवसांतील बराचसा वेळ पूजा–अर्चा करण्यांत, गुरूंचा उपदेश ऐकण्यांत ती घालवूं लागली. रोज उपास–तापास करून स्वतःचं शरीर तिन कृश करून घेतलं.

एके दिवशी तारापीडला अगदी पहाटेस एक स्वप्न पडलं. त्यानं पाहिलं कीं राणीच्या तोंडांत चंद्र प्रवेश करीत आहे. राजा जागा झाला. त्यानं मंत्र्याला बोलावलं. त्याला पडलेलं स्वप्न सांगितलं. मंत्री म्हणाला, "हा शुभशकुन आहे. महाराज, आपणाला पुत्र रत्न होणार याचं हें चिन्ह आहे." आणि झालंही तसंच. मंत्र्याची वाणी खरी ठरली. राणी गर्भवती झाली तिच्या चेहऱ्यावर चंद्रासारखं तेज पसरूं लागलं. राजाला अपरंपार आनंद झाला. राणीची तपश्चर्या फळाला आली.

राजा राजसभेंत बसला असतां एक दासी तिथें आली व तिनं पुत्र जन्माची वार्ता सांगितली. राजा खुष झाला. त्यानं

त्या दासीला फार मोठें बक्षीस दिलं. सभा संपवून राजा मंत्र्याबरोबर प्रसूतिगृहांत गेला. तिथं जाऊन त्यानं राजकुमाराचं दर्शन घेतलं. राजकुमार म्हणजे चंद्राचा जणु तुकडाच. चक्रवर्तीच्या हातावर जशीं लक्षणं असतात तशी सर्व त्या मुलाच्या हातावर होती. आपणाला चक्रवर्ती मुलगा झाला या आनंदानं राजा बेहोश झाला.

सारी उज्जयनी नगरी पुत्रजन्मानं नटली. जागजागीं रंग उधळण्यांत आला. गांवभर एकच चर्चा होती.

कारावासांतील सर्व बंद्यांना मुक्त करण्यांत आलं.

इतक्यांत मंत्र्यालाहि मुलगा झाल्याची वार्ता राजाला कळाली. दोघांच्या आनंदाला सीमाच उरली नाहीं.

बाराव्या दिवशीं राजाच्या मुलाचं नांव चंद्रापीड व मंत्र्याच्या मुलाचं नांव वैशम्पायन ठेवण्यांत आलं. दोघेहि चंद्राप्रमाणं वाढू लागले. त्यांच्या शिक्षणासाठीं नदीजवळ एक मोठी पाठशाळा स्थापन करण्यांत आली. त्या पाठशाळेंत त्यांना काव्य, शास्त्र, शस्त्र, युद्धनीति इत्यादि विषयांच्या अभ्यासाची सोय करण्यांत आली. मल्लविद्येसाठीं अनेक ठिकाणचे मल्ल मुद्दाम पाचारण करण्यांत आले होते. अनेक चांगल्या विद्वानांच्या संगतीनं त्यांच्या मनावर चांगले संस्कार झाले.

राजकुमार चंद्रापीड तर एखाद्या मनोहर युवकाप्रमाणं दिसूं लागला. त्याचं तें कसदार व पिळदार शरीर! मुखावर चमकणारं अमूर्त सौंदर्य! शिक्षण संपल्यावर गुरुंनी त्यांना घरीं जायला परवानगी दिली. ही वार्ता ऐकून राजानं रथ

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

पाठवून त्यांना नगरांत आणण्याची मंत्र्याला आज्ञा केली. फारच थाटानं त्यांनी नगरांत प्रवेश केला. राजपुत्र व मंत्रीपुत्रांना पाहण्यासाठीं रस्त्यावर नागरिकांची एकच गर्दी उसळली. कुमारी मुलींनी तर सर्व रस्ते अगोदरच अडविले होते. ज्यांचीं नुकतीच लग्न झालीं होतीं त्यांना पश्चाताप होत होता.

दोघाहि मुलांनी राजाला नमस्कार केला. राजानं दोघांनाहि छातीशी प्रेमानं धरलं अन् कुरवाळलं. राजा म्हणाला, "आज पृथ्वी धन्य झाली आहे. ब्राम्हणांचे आशिर्वाद फळाला आलें आहेत."

चंद्रापीडाला राज्यपद देऊन तारापीड सुखानं राहूं लागला. राज्यपद मिळाल्यावर राज्य वाढवावं म्हणून सैन्य सज्ज करून तो निघाला. इतकं मोठं सैन्य पाहूनच राजे लोक त्याला शरण येत. हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ अशा चतुरंग सेनेपुढें लढण्यासाठीं कुणीच तयार होत नव्हता. अनेक राजांना जिंकत जिंकत चंद्रापीडाची सेना कैलास शिखरा जवळ जाऊन पोंहचली. तेथील आल्हादकारक हवा, अनेक वनलतांनी गजबजून गेलेलं वन, कमलांनी व हंसांनी युक्त अशीं सरोवरं पाहून चंद्रापीडानं विचार केला कीं कांहीं दिवस अशा रम्य वनांत विश्राम करावा. वैशम्पायनला त्यांनी आपला विचार कळविला.. वैशम्पायनाबरोबर तो त्या वनाची शोभा पहात राहिला.

ज्या घोड्यावरून त्यानं हा सारा दिग्विजय केला त्याचं नांव होतं इन्द्रायुध. इन्द्रायुध घोडा अनेक प्रकारच्या युद्धांत वाकबगार होता.

एके दिवशीं तो इन्द्रायुध घोड्यावर बसून शिकारीस निघाला. त्या वनांत त्यानें एका किन्नर पतिपत्नींना पाहिलं. त्यांचा पाठलाग करावा म्हणून त्यांनं घोड्याला टांच दिली. इन्द्रायुध हवेच्या वेगानं पळूं लागला. पण किन्नर कांहीं सांपडू शकले नाहींत. चंद्रापीड थकला. तो एका झाडाखाली झोपीं गेला.

इतक्यांत कुठून तरी त्याला वीणेचे सुंदर स्वर ऐकूं आले. त्यानें डोळे उघडून पाहिलं तर कुणीच नाहीं. इन्द्रा-युधाच्या पाठीवर बसून तो आवाजाचा मागोवा घेत निघाला. एका देवळापाशी आल्यावर त्यानं पाहिलं कीं अत्यंत रुपवती अशी एक सोळा वर्षांची मुलगी शंकराचं ध्यान करीत आहे. त्या कुमारिकेनं अंगावर भस्माचे पट्टे ओढले होते. गळ्यांत जपमाळा घातली होती.

ध्यानांतून उठल्यावर तिनं राजकुमारकडं पाहिलं. त्याला पाहून तिनं त्याला आपल्या आश्रमांत येण्याची विनंती केली. आश्रमांत गेल्याबरोबर त्या कुमारिकेनं चंद्रापीडाला एका आस-नावर बसण्यास खुणविलं. व स्वतः आश्रमांतील वृक्षांचीं फळें तोडून आणून त्याला खायला दिली.

खरं म्हणजे त्याला खूपच भूक लागली होती. त्यानं त्या फळावर ताव दिला.

रात्रभर आश्रमांत रहावं अन् मग परतावं असं त्यानं ठरवलं.

आकाशांत चंद्र उगवला. झोप तर इतक्या लवकर येणें शक्यच नाहीं. तेव्हां त्यानं तिला विचारलं, 'राग नसेल तर विचारतो."

"विचारा कीं—त्यांत राग कसला?"

"तुम्ही असल्या निर्जन अरण्यांत कां राहतां? आणि इतक्या तरुणपणीं असलं हें तपस्विनीचं रूप कां धारण केलं आहे?"

त्यानं जणुं तिची जखम उघडी केली. तिच्या हृदयांतील दुःखाला वाचा फुटली. तिनं एक दीर्घ उसास टाकला. ती म्हणाली—"माझा जन्म गंधर्व कुळांत झाला. माझ्या वडीलांचं नांव हंस; आईचें नांव गौरी आणि माझं नांव महाश्वेता. एकदां वसंत ऋतूंत मी आईबरोबर जवळच्याच सरोवरावर स्नानाला आलें होतें.

त्याचवेळीं एक अत्यंत तेजस्वी मुनिकुमारहि स्नानाला आला होता. त्याचं तारुण्य व रूप पाहून मी भाळलें. हाच नवरा मिळावा म्हणून मी मनांतच त्याला वरलं. मी त्याला त्याचं नांव विचारलं. तो म्हणाला, "पुण्डरीक" त्याच्या कानांत पारिजात वृक्षांची मंजिरी लटकत होती. त्या मंजिरीचा सुवास सर्वत्र दरवळत होता. मी विचारलं,

"कुठं आहेत एवढी सुंदर मंजिरीची झाडं?"

त्यानं कांहींच उत्तर केलं नाहीं. मला मंजिरी आवडली होती. हें त्यानं ताडलं. ती मंजिरी त्यानं माझ्या कानांत अडकविली. माझ्या अंगाचा स्पर्श होताच त्याचं मन विचलित झालं. सारं अंग थरारलं.

मला देखील वाटलं; नवरा मिळावा तर पुण्डरीका सारखा. त्याच विचारांत मी गर्क झालें. पुण्डरीकाच्या हातांतून

गळून पडलेली रुद्राक्षाची माळ मी आपल्या गळ्यांत घातली.

त्या पुण्डरीकाचा कपिंजल नांवाचा एक मित्र होता. त्यानं पाहिलं कीं पुण्डरीकाच्या हातांत जपमाळ नाहीं. त्यानं विचारलं,

"कुठे आहे तुझी जपमाळ."

तो धाबरला.

तें पाहून कपिंजल हंसू लागला. तो म्हणाला,

"पुण्डरीका, तुझं मन आणि माळ त्या महाश्वेतेनं चोरली आहे. पुण्डरीक रुद्राक्षमाळ मागायला मजजवळ आला.

मी देखील त्याच्या प्रेमांत सांपडलें होतें. मी माळ न देता रत्नांचा हार त्याला दिला. व आश्चर्य हें कीं तो ती रत्नमाला जपमाळ समजून घेऊन गेला.

आम्हां दोघांचं एकमेकावर खूप प्रेम जडलं. मला कांहींच सुचत नव्हतं कीं रुचत नव्हतं. फक्त पुण्डरीकाला केव्हां पाहीन हीच एक इच्छा होती.

एके दिवशीं अगदींच राहवलें नाहीं म्हणून तरलिका नांवाच्या मैत्रीणीसह मी पुण्डरीकाकडे जायला निघाले. वाटेंत कपिंजलाचं रडणं मला ऐकूं आलं. माझ्या हृदयांत एकदम धस्स झाल. मी पळतच त्या जागीं गेलें. पाहतें तो पुण्डरीक मरून पडलेला. रडून रडून मी आकाश पाताळ ऐक केलं. पण काय उपयोग?

मी आणि कपिंजलानं चिता रचली. आणि पेटणार इतक्यांतच एक मोठा आवाज झाला. सारं आकाश प्रकाशानं झळाळलं. कोणी तरी देवदूत खाली उतरला. त्यानं पुण्डरीकाचं शव घेतलं. व तें दिव्य विमानांत ठेवून तो स्वर्गाकडे जायला निघाला. मी त्याची खूप विनवणी केली. तो म्हणाला, "पुण्डरीक मेला नसून तूं सती जाऊं नकोस. तो तुला अव-श्यच भेटेल."

तो स्वर्गाला निघाला हें पाहून कपिंजलहि विमानाला धरून आकशांत उडाला.

क्षणांत तें विमान लुप्त झालें. मी शोक करीत बसले. तरलिका म्हणाली, "देववाणी असत्य होत नाहीं. चल. आज नाही उद्या पुण्डरीक अवश्य भेटेल यांत मला मुळींच शंका नाहीं."

माझ्या मनांत वैराग्य निर्माण झालं. आणि अद्याप पावेतों पुण्डरीकाचें दर्शन घेण्यासाठीं अशी बैरागीण होऊन मी दिवस कंठित आहे.

ही महाश्वेतेची कथा ऐकून राजपुत्र चंद्रापीडाला फारच मजा वाटली. तो महाश्वेतेला म्हणाला, "धन्य आहे तुमच्या अमर प्रीतीची! पतीची आराधना करण्यासाठीं तुम्ही किती कष्ट सहन करीत आहांत! पार्वतीची तपश्चर्या देखील अगदीच तुच्छ वाटते मला.

त्याच्या तोंडांतून आपली स्तुति ऐकून ती म्हणाली, "चुकता आहांत तुम्ही. मी कांहींच तप केल नाहीं. माझी

एक मैत्रिण कादम्बरी नांवाची आहे. तिचं कथानक ऐकाल तर तोंडांत बोटं घालाल तुम्हीं."

राजपुत्राच्या मनांत कादंबरीची गोष्ट ऐकण्याची इच्छा निर्माण झाली. व तो आतुर होऊन म्हणाला, "मग कादंबरीची गोष्ट मला कां सांगत नाहीं. अद्याप रात्र तर भरपूर आहे."

महाश्वेता म्हणाली, "कादंबरीचा जन्म एका अप्सरेच्या पोटीं झालेला. तिच्या सौंदर्यापुढं मी अगदी काजव्यासारखी. कारण अप्सरेचं कुल अमृतांतून निर्माण झालं. तिच्या आईचं नांव मदिरा व वडीलांचं चित्ररथ. चित्ररथ गंधर्व कुळांतले."

"वाह्वा.... वडील गंधर्व व आई अप्सरा. मग काय विचारतां तिच्या सौंदर्याची कथा!"

"छे! छे! ती केवळ सुंदरच नाहीं तर गुणी आहे. माझा अन् तिची अगदी जीवश्चकण्ठश्च मैत्री! आमची शरीरं दोन अन् प्राण एक, असंच समजाना! ती एकुलती एक मुलगी. म्हणून आई वडीलांच तिच्यावर फार प्रेम. माझ्या प्रेमाची कथा तिच्या कानीं पडली. मी दुःखी म्हणून तीहि दुःखी इतकी कीं माझं लग्न होईपर्यंत तिनंहि सारे अलंकार टाकून दिलें. अगदी माझ्यासारखीच तपस्विनी होऊन ती राहूं लागली. मी तिला परोपरीनं समजावलं. पण ती हट्टी. माझं तिनं कांहीं ऐकल नाहीं, अधीं तुझं लग्न अन् नंतर माझं हें तिचं उत्तर.

उद्या आपण तिला भेटूच. इथं जवळच ती रहात आहे.

या नंतर ते दोघेही झोपायला निघून गेले. चंद्रापीडाला झोप आली नाहीं. ऐकावं तें तें नवलच, असं त्याला वाटल.

दुसरें दिवशीं दोघेहि कादंबरीच्या राजमहलांत गेले. गंधर्व नगरीची ती शोभा पाहून कुमार चन्द्रापीड अगदी थक्क झाला. आकाशाचीं चुंबनं घेणारीं शिखरं, रत्नजडित महाल, व स्फटिकाच्या भिंती पाहून त्याला मौज वाटली.

राजमहलांतला थाट तर याहूनहि मोठा. हजारो सुंदर सुंदर स्त्रिया कादंबरीच्या सेवेला होत्या. स्वर्गीय फुलांच्या वासानं राजवाडा सुगंधित झाला होता.

इतक्यांत कादंबरी सामोरी आली. कादंबरीनं कुमाराला सुवर्ण सिंहासनावर बसविलं. महाश्वेतेनं कुमाराचा परिचय करून दिला. चंद्रापीडाचं तें सौंदर्य पाहून कादम्बरी मोहित झाली. तो दिवस त्यानं गंधर्व नगरींतच काढला. दुसरें दिवशीं चंद्रापीड जायला निघाला. कादम्बरीला वाईट वाटल. त्याला आपल्या महालांत ठेवून घ्यावं असं तिला वाटलं. प्रेमाची खूण म्हणून तिनं चौदा रत्नाचा एक हार त्याला भेट म्हणून दिला. व पुनः भेटण्याची विनंती केली. तिची विनंति मान्य करून चन्द्रापीड इन्द्रायुधावर बसून निघून गेला.

इकडे त्याचं सैन्य कैलासाजवळ विश्रांतीसाठीं बसून होतं. चार दिवस झाले तरी कुमार चंद्रापीड आले नाहींत म्हणून वैशम्पायन फारच चिंतातुर झाला होता. परंतु चंद्रापीड परत आलेला पाहून त्याला आनंद झाला. त्यानं त्याला घट्ट मिठी मारली. चंद्रापीडानं गेल्या चार दिवसाचा वृत्तांत त्याला सांगितला.

इतक्यांत एक दूत उज्जैनीहून चंद्रापीडाकडे आला. त्यानं एक बंद लखोटा कुमारपुढं धरला. तो हातांत घेऊन त्यानं तो उघडून वाचला. त्यांत लिहलं होतं, 'प्रिय मुला' आम्ही तुझी वाट पहात आहोत तरी लवकर निघून येणें. तुझ्या वियोगानें तुझी आई सारखा शोक करीत आहे." तरी अनमान करूं नये. कळावे.

तुझ वडाल

तारापीड

वडीलांचं पत्र वाचून चंद्रापीडाला आनंद झाला. सर्व सैन्याला घेऊन यायला वैशम्पायन मित्राला सांगून तो इन्द्रा–युधावर बसून ताबडतोब उज्जयिनीला निघाला.

त्यानं आई–वडीलांचं दर्शन घेतलं. सर्वांना आनंद झाला. सर्व नागरिकांनी त्याच्या विजयाबद्दल त्याचा गोरव केला.

कांही दिवसांनी त्याला असं कळालं कीं त्याचं सैन्य परत आल आहे. मित्राचं स्वागत करण्यासाठीं तो नगराची वेस ओलांडून बाहेर गेला. सर्व सैन्य आलं. पण वैशम्पायन कुठें दिसेना. त्यानं चौकशी केली. तेव्हां एकानं सांगितलं कीं अक्षौद सरोवरावर त्यानं जी बैठक मारली ती त्यानं सोडलीच नाहीं. विनंति करूनहि तो परत यायला तयार झाला नाहीं. तेव्हां मित्राबद्दलची ही हकीगत ऐकून तो खिन्न झाला. आई वडीलांची परवानगी घेऊन व मित्राच्या आईची समजूत काढून त्याचा शोध काढण्यासाटीं तो पुनः बाहेर पडला. त्याच्या मनांत अनेक तर्क वितर्क येत होते.

कैलासांत हिंडता हिंडता तो पुनः महाश्वेताच्या आश्रमांत गेला. तेथे पाहतों तर महाश्वेता रडत बसलेली. तिचा चेहरा अगदी उतरून गेला होता. तिला दुःखी पाहून चन्द्रापीडाचं हृदय कारूण्यानं भरून गेलं. तो तिच्याजवळ गेला आणि म्हणाला, "इतकं कष्टी व्हायला काय झालं? "

ती म्हणाली, 'आर्यपुत्रा, माझ्या हातून एक फार मोठं पातक घडलं आहे. त्या पातकाचं पिशाच्च मला जाळीत आहे.''

"कसलं पातक....? संसारांतील सर्व पातकें प्रायश्चित्तानं नष्ट होतात. मग तेव्हां ती म्हणाली, सैन्यासह तुमचा मित्र परत जात असतां अक्षोद सरोवरावर त्याची माझी भेट झाली. त्यानं मला लग्नाची विनंति केली. मला वाटलं हा कोणी तरी दुष्ट मानव आहे. म्हणून मी शाप दिला, "हे दुष्ट मानवा तूं तात्काळ पोपट होऊन मरशील."

झालं क्षणांत तो पक्षी होऊन मरून पडला.

आपल्या मित्राच्या मरणाची गोष्ट ऐकतांच चन्द्रापीडच्या हृदयांत कळ आली. व तोहि तेथेच मरून पडला. महाश्वेता तर आणखीच शोक करुं लागली.

चन्द्रापीड महाश्वेतेच्या आश्रमांत आल्याची वार्ता कादंम्बरीला समजली होती. तीहि त्या ठिकाणीं आपल्या प्रियकराला भेटायला आली. पण येऊन पाहते तर चंद्रापीड मरून पडलेला. तिनं त्याला मिठी मारली. व जोरजोरांत रडूं लागली.

तिचा स्पर्श होताच एक दिव्य वाणी तिला ऐकुं आली: "हे मुलींनों तुम्ही घाबरूं नका. चन्द्रापीड मेलेला नाहीं. कांहीं काळानं तो जिवंत होईल. तोपर्यंत तुम्ही त्याच्या प्रेताचं रक्षण करा."

हा सर्व प्रकार काय आहे 'हें दोघींनाहि कळलं नाहीं. महाश्वेता तर फारच उद्विग्न झाली. त्या उद्वेगाच्या भरांत ती चंद्रापीडच्या घोड्याला म्हणाली, "मालक मेल्यावर तुझं काय काम. तूंहि मर जा त्या अक्षोद सरोवरांत."

असं म्हणून ती गप्प बसली नाहीं. तर स्वत: त्या घोड्यास सरोवरांत लोटून दिलं. घोडा बुडाल्याचे बुडबुडे येतात न येतात तोंच एक तेजस्वी नवजवान सरोवरांतून बाहेर आला. त्याच्याकडं न्याहाळून पाहतांच तिला आठवण झाली. तो दुसरा तिसरा कुणी नसून विमानाला धरून स्वर्गांत गेलेला कपिंजल आहे.

ती फार आनंदित झाली. कपिंजलाला तिनं सारी हकीगत विचारली. सारख्या प्रश्नांच्या सरबत्तीनं कपिंजल चिडला. व म्हणाला, "अहो, कांही दम घ्याल कीं नाही. तुमच्या अनेक प्रश्नांचीं उत्तरं मी एकदम कसा देईन."

यावर महाश्वेता हंसून म्हणाली, 'तुझं कुणावर प्रेम दिसत नाहीं. नाहींतर उत्कण्ठा म्हणजे काय हें तुला कळालं असतं."

कपिंजल सांगू लागला:

अनुक्रम
विभाग
क्रमांक ४३६
नों. दि.

"मी स्वर्गांत गेलों. पुण्डरीकाचं प्रेत सांभाळून ठेवणं या भूतलावर कठीण म्हणून चंद्राच्या आज्ञेवरून तें प्रेत स्वर्गांत ठेवण्यांत आलं. चंद्राची त्याच्यावर फारच माया दिसली.

"पण चंद्राला एवढं प्रेम कां वाटलं पुण्डरीकाविषयीं?" पुनः महाश्वेतेनं प्रश्न विचारला.

"त्याचं असं कीं पुण्डरीकाची आई गौरी. तिच्या जन्माला चन्द्रच कारणीभूत झाला. तेव्हां गौरी चन्द्राची मुलगी झाली. आणि गौरीचा मुलगा म्हणून पुण्डरीक चन्द्राचा नातू. आणि अशा नातवाची तूं होणारी भावी सून म्हणून तुझ्यासाठी तरी त्याला जिवंत ठेवणं भाग होतं.

आपला आवडता पुण्डरीक पुनः जिवंत होईल या विचारानं तिला हायसं वाटलं.

कपिंजल म्हणाला—

इतकंच नाहीं तर स्वर्गांत असतां मला अशीहि बातमी लागली कीं स्वतः चंद्राला शाप मिळाला असून तो चन्द्रापीड नांवानें उज्जनीस जन्माला येणार आहे. आणि पुण्डरीक देखील त्याच नगरांतील शुकनास महामंत्रीचा मुलगा वैशंपायन जन्म घेईल.

वैशंपायनच आपला आवडता पुण्डरीक असतां त्याला आपण शाप देऊन पोपट केला याबद्दल तिला हळहळ वाटूं लागली.

त्यानंतर कपिंजल म्हणाला आता मी जातों. पण तुम्ही दोघी प्रेताचं रक्षण करा.

तेव्हां महाश्वेता म्हणाली, "अद्याप हें तर कळालंच नाहीं कीं तूं चन्द्रापीडचा घोडा कसा झालास."

कपिंजल म्हणाला, "अरेच्या, सांगण्याच्या भरांत तें सांगायचं राहूनच गेलं." असं म्हणून तो सांगूं लागला, "मी स्वर्गांतून परत येतांना आकाशांत एका माणसाची आणि माझी भेट झाली. तो माणूस अत्यंत तापट. कशावरून तरी आमचें भांडण होऊन त्यानं मला शाप दिला 'तू घोडा होशील.'

मी घाबरून त्याच्या पाया पडलों. तेव्हां तो शांत झाला. आणि म्हणाला, मी तुला उश्शाप देतों कीं तुला महाश्वेता जेव्हां आक्षोद सरोवरांत ढकलून देईल तेव्हां तूं पुनः मानवरूप घेशील."

मी त्याला पुनः हात जोडून विनंती केली कीं येरे गबाळ्याचा घोडा करण्यापेक्षां मला तूं उज्जैनच्या चंद्रपीड राजाचा घोडा कर. माझी विनंती त्यानं मान्य केली.

मी घोडा होऊन चंद्रपीडाची सेवा करुं लागलों. तुमच्या मुळेंच मी पुनः मानवाचं शरीर मिळवूं शकलों. तुम्ही माझी आई आहांत. तुम्ही मला नवा जन्म दिला. असं म्हणून तो निघून गेला.

महाश्वेतानं चंद्रपीडाचं प्रेत जपून ठेवल. चंद्रपीडाच्या व वैशम्पायनाच्या मृत्यूची बातमी त्यांच्या आईवडिलांना कळाली तेहि शोककुल होऊन त्या आश्रमांत येऊन राहिले. महाश्वे- तेच्या आश्रमाला फार मोठं स्वरूप प्राप्त झाल.

अनेक दिवसामागोमाग महिने, व अनेक महिन्यानंतर वर्षे गेली पण कुणीच जिवंत होईना. एकेदिवशी कादम्बरीनं

पाहिल कीं चंद्रापीड जिवंत होत आहे. त्याच्यांत चैतन्य परत येत आहे. ती आनंदानं वेडी झाली. तिनं त्याला मिठी मारली.

इतक्यांत स्वर्गातून एक दिव्य प्रकाशाचा झोत जमिनी-कडे येऊ लागलेला महाश्वेतेनं पाहिला. जेव्हां तो अगदीच जवळ आला तेव्हां तिनं ओळखल कीं हाच आपला प्रियकर पुंडरीक म्हणजेच चंद्रपीडाचा मित्र वैशम्पायन. वैशम्पायनानं आपल्या आवडत्या आईवडिलांना नमस्कार केला. आईवडिलांनी महाश्वेता व वैशम्पायन यांच्या लग्नाचा सोहळा मोठ्या थाटानं पार पाडला.

कादम्बरीचे वडील तर गंधर्व. त्यांनी गंधर्व प्रदेशाचं राज्य चंद्रपीडाला दिल व कादम्बरीचा विवाह चंद्रापीडाशी केला. हा सोहळा पाहण्यासाठीं यक्ष, किन्नर सारे जमले. देवांनी स्वर्गातून फुलें उधळली.

अनुक्रम 2210
विभाग
दि.
वाचनालय

क्र. 6296
वि.

IRBK-0106246
IRBK-0106246